**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-422 002**

**रजि. ऑफीस** - "आदिवासी विकास भवन", 3 रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-2

**दुरध्वनी** - (0253) 2315860,

Web-www.mahashabari.in E-mail- shabarinsk@gmail.com


# एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे उमेदवारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येत असुन https://mahashabari.in/ या संकेतस्थळावर दि.२०.०२.२०२५ पर्यंत कर्ज मागणी अर्ज मागविण्यांत येत आहेत. सदर कर्ज योजनांचा इच्छुक उमेदवारांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यांत येत आहे.

त्याअनुषंगाने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविणेकामी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळांतर्गत एकुण १२ शाखा कार्यालयांना खालीलप्रमाणे लक्षांक विभागून देण्यांत आलेला आहे.

| अ.क्र. | शाखा कार्यालयाचे नाव | महिला सबलीकरण योजना (रु.२ लक्ष) | स्वयंसहाय्यता बचतगट (रु.५ लक्ष) | कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु.२ लक्ष) | हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष) | ऑटो वर्कशॉप / गॅरेज / स्पेअर पार्ट (रु.५ लक्ष) | लहान उद्योगधंदे (रु.२ लक्ष) | वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष) | ऑटो रिक्षा / मालवाहू रिक्षा (रु.३ लक्ष) | लघु उद्योग व्यवसाय (रु.३ लक्ष) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **लक्षांक** | **४१०** | **१०१** | **३९२** | **८४** | **८४** | **१६७** | **३५** | **२८** | **६५** | **१३६६** |
| **1** | नाशिक | ६१ | १५ | ५९ | १३ | १३ | २५ | ०५ | ०४ | १० | २०५ |
| **2** | जव्हार | ७८ | २० | ७४ | १७ | १७ | ३२ | ०६ | ०५ | १२ | २६१ |
| **3** | जुन्नर | ४२ | १० | ३९ | ०८ | ०८ | १७ | ०३ | ०४ | ०६ | १३७ |
| **4** | नंदुरबार | ७० | १७ | ६६ | १५ | १५ | २८ | ०६ | ०६ | ११ | २३४ |
| **5** | यावल | ३७ | ०९ | ३४ | ०८ | ०८ | १५ | ०३ | ०२ | ०६ | १२२ |
| **6** | धारणी | २० | ०५ | २० | ०४ | ०४ | ०८ | ०२ | ०१ | ०३ | ६७ |
| **7** | यवतमाळ | २० | ०५ | २० | ०४ | ०४ | ०८ | ०२ | ०१ | ०३ | ६७ |
| **8** | किनवट | १६ | ०४ | १६ | ०३ | ०३ | ०७ | ०१ | ०१ | ०३ | ५४ |
| **9** | देवरी | १४ | ०३ | १२ | ०२ | ०२ | ०५ | ०२ | ०१ | ०२ | ४३ |
| **10** | चंद्रपूर | १६ | ०४ | १६ | ०३ | ०३ | ०७ | ०१ | ०१ | ०३ | ५४ |
| **11** | गडचिरोली | १६ | ०४ | १६ | ०३ | ०३ | ०७ | ०२ | ०१ | ०३ | ५५ |
| **12** | नागपूर | २० | ०५ | २० | ०४ | ०४ | ०८ | ०२ | ०१ | ०३ | ६७ |
| | **Total** | **४१०** | **१०१** | **३९२** | **८४** | **८४** | **१६७** | **३५** | **२८** | **६५** | **१३६६** |

**कर्ज योजनेचे स्वरुप-**

**अ) मुदत कर्ज योजना - (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | ५% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | ५% |

सदर कर्ज योजने अंतर्गत कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु.२ लक्ष), हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष), ऑटो वर्कशॉप / गॅरेज / स्पेअर पार्ट (रु.५ लक्ष), लहान उद्योगधंदे (रु.२ लक्ष), वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष), ऑटो रिक्षा / मालवाहू रिक्षा (रु.३ लक्ष), लघु उद्योग व्यवसाय (रु.३ लक्ष) यासांरख्या योजनांसाठी अल्प व्याजदराने कर्ज वाटप करण्यांत येते.

**ब) महिला सशक्तीकरण योजना :- (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजने अंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसाय तसेच लाभार्थींच्या पंसतीनुसार व्यवसायासाठी रक्कम रु.२.०० लक्ष कर्ज वाटप करण्यांत येते.

**क) स्वयंसहाय्यता बचतगट योजना-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजने अंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसायासाठी रक्कम रु.५.०० लक्ष कर्ज वाटप करण्यांत येते.

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी** :-

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.

२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.

४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वत:चा हिस्सा म्हणून ५% सहभाग रक्कम घेण्यांत यावी.

५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.

६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

**कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)

२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)

३) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वत: इच्छुक लाभार्थीना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.

६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.

७) रेशनकार्ड छायाप्रत.

८) आधारकार्ड.

९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.

१०) लाभार्थ्यांचे स्वत:चे बॅंक खात्याचे पासबुकची छायाप्रत.

११) तीन पासपोर्ट साईज फोटो.

१२) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमीट वाहनासाठी आवश्यक कागदपत्रे.

**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बॅंक खाते उतारा / स्टेटमेंट.

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

**योजनानिहाय व्याजदराचा तपशिल-**

१) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.

२) रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर द.सा.द.शे.६% सरळ व्याज आकारले जाते. तर रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारणी केली जाते.

३) रु.१० लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.१०% सरळ व्याज आकारले जाईल.